माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (अग्निशमन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०७१/२०२३
दि.२१/०३/२०२३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (अग्निशमन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.विनीत डी. शाह, ................अपिलार्थी
५०३, वंदना गॅलेक्सी, नारायण स्कूल जवळ,
टेंभा रोड, भाईंदर (प.).

श्री.प्रकाश बोराडे, ................प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा
प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग.

## -: विवेचन :-

श्री.विनीत डी. शाह यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांचेकडे "Year-wise Detailed documents of All Audit (Internal audit, A G Directorate of State Local fund Audit" बाबत दि.१०/०२/२०२३ रोजी खालील प्रमाणे माहिती अधिकार अंतर्गत अर्ज सादर केला.

1 a) Query raised, Query resolved, Query pending, of Internal Audit.
2 b) Query raised, Query resolved, Query pending of State Local Audit.
3 c) Query raised, Query resolved, Query pending of A. G.
4 d) प्रशासनाने वार्षिक लेखे/ अहवाल स्थायी समितीपुढे मंजुरी दिल्याची ठराव. अथवा कारण नमुद.
5 e) Reason recorded for Query pending for Internal audit, AG, State local audit along with details of officer, employee responsible.
6 f) Audit Inspection report & Completion certificate for AG, State audit, Internal audit.
7 g) Notices issued, disciplinary action taken against department by any Audit office, Mbmc commissioner etc & Action taken on such orders, notices
8 h) Cataloguing & indexing of records present in your office to be provided as per sec 4.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.१०/०२/२०२३ रोजीच्या अर्जानुसार माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१३/०३/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (अग्निशमन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२१/०३/२०२३ रोजी सकाळी ११.४५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.अग्नि/८६/२०२३ दि.१४/०३/२०२३ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग आणि अपिलार्थी अर्जदार हे सुनावणीस उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:- माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिलेली नाही.

जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:- माहिती अधिकार अर्जातील नमुद मुद्दे हे लेखा परीक्षण विभागाशी संबंधित असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: निर्णय :-

१) अर्जदार यांनी दि.१०/०२/२०२३ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांचेकडे माहिती अधिकार अर्ज दाखल केला आहे. परंतु माहिती अधिकार अर्जातील मुद्दे हे लेखा परीक्षण विभागाशी संबंधित असल्याने माहिती अधिकार कलम ६(३) अन्वये सदरचा अर्ज लेखा परीक्षण विभागाकडे वर्ग करणे अपेक्षित होते. परंतु जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांनी माहिती अधिकार अर्ज संबंधित विभागास वर्ग न केल्याचे दिसून येते. सबब, यापुढे जनमाहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांनी आपल्या विभागाशी संबंधित नसलेला माहिती अधिकार अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करणेबाबत दक्षता घेणेत यावी.

२) अर्जदाराने दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जातील मुद्दे हे अंतर्गत लेखापरीक्षण विभागाशी संबंधित असल्याने जनमाहिती अधिकारी तथा लेखापरीक्षा अधिकारी, अंतर्गत लेखा परीक्षण विभाग यांनी अर्जदारास अभिलेखात उपलब्ध असणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(मारुती गायकवाड)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (अग्निशमन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोच
23/03/23
लिपिक
अलेप विभाग

प्रति:-

१) श्री.विनीत डी. शाह,
५०३, वंदना गॅलेक्सी, नारायण स्कूल जवळ,
टेंभा रोड, भाईंदर (प.)

23/3/2023

२) जन माहिती अधिकारी तथा प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग.

३) जन माहिती अधिकारी तथा लेखापरीक्षा अधिकारी, लेखापरीक्षण विभाग

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (अग्निशमन) यांचे कार्यालय.

o/c

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय**

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./ 06 /2023-24 दि.24/04 /2023

प्रति

श्री. विनित डी. शहा

503, वंदना गॅलेक्सी, नारायण स्कुल जवळ,

टेंभा रोड, भाईंदर (प).

विषय:- माहिती अधिकार अधिनियम-2005

अग्निशमन विभागांतर्गत सन 2003 ते जाने-2022 पर्यंतचे प्रलंबित लेखापरीक्षण विभाग, स्थानिक निधी व ए.जी च्या अहवाल बाबतची माहिती.

संदर्भ:- मा. उपायुक्त (मु) तथा मा. अपिलीय अधिकारी यांचे दि.21/03/2023 रोजीचा अपिल निर्णयाची प्रत

महोदय,

माहिती अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत मा. उपायुक्त (मु) तथा प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दिलेल्या अपिल निर्णयाच्या अनुषंगे अग्निशमन विभागाशी संबंधित असलेली लेखा परीक्षण अहवालाबाबतच्या मुद्द्याची खालीलप्रमाणे माहिती देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| मुद्दा क्र. A | लेखापरीक्षण विभागाने केलेल्या अग्निशमन विभागाच्या लेखा परीक्षण अहवालामध्ये सदर कालावधी मध्ये एकुण 82 आक्षेप काढण्यात आले असुन त्यानुसार 29 आक्षेपाची पुर्तता करणेत आली व 53 आक्षेप प्रलंबित आहेत. पुर्तता करण्यात आलेले आक्षेप सोबत जोडले आहे. पृष्ठ क्र. :- 01 ते 191 |
| मुद्दा क्र. B & C | स्थानिक निधी लेखा, नवि मुंबई व महालेखाकार यांचेकडुन करण्यात आलेला लेखापरीक्षण बाबतचे आक्षेप / परिच्छेदांचे अनुपालन हे परस्पर विभागाकडुन संबंधीत कार्यालयाला सादर केले जातात. |
| मुद्दा क्र. D | मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या सन 2003-04 ते 2017-18 मधील दप्तरी उपलब्ध असलेल्या ठरावाच्या प्रति सोबत जोडल्या आहेत. पृष्ठ क्र. :- 193 ते 210 |
| मुद्दा क्र. E | अग्निशमन विभागाकडे स्थानिक निधी, महालेखाकार व मनपा लेखापरीक्षण विभागामधील प्रलंबित असलेल्या आक्षेपांची कारणे अग्निशमन विभागाने लेखापरीक्षण विभागास सादर केलेली नाहीत. सबब संबंधीत मुद्द्याबाबत अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा. |

E:\audit dep 2020-21\माहिती अधिकार\विनित शहा, Interanal, ag, local.docx

| | |
|---|---|
| मुद्दा क्र. F | 1) सन 2017-18 पर्यंत अंतर्गत लेखापरीक्षण पुर्ण झाले असुन त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली आहे. (सोबत ठराव जोडला आहे) पृष्ठ क्र. :- 210<br>2) सन 2017-18 पर्यंत स्थानिक निधी लेखा नवि मुंबई यांनी लेखापरीक्षण पुर्ण केले आहे. सदर अहवाल मनपाच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.<br>3) सन 2022-23 पर्यंत महालेखाकार कार्यालयाकडुन लेखापरीक्षण पुर्ण करण्यात आले आहे. पत्र सोबत जोडले आहे. पृष्ठ क्र. :- 211 ते 213 |
| मुद्दा क्र. G | अग्निशमन विभागास देण्यात आलेले पत्र सोबत जोडले आहे. पृष्ठ क्र. :- 215 |
| मुद्दा क्र. H | सन 2003-04 ते 2017-18 पर्यंतचे अंतर्गत लेखापरीक्षण पुर्ण केले असुन सदर अहवाल सुरक्षित अभिलेख्यात ठेवणेत आले आहेत तसेच सदरचे अहवाल www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. |

उपरोक्त माहिती संदर्भात आपले समाधान न झाल्यास व्दितीय अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई -400614 यांच्याकडे सदर माहितीच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

सहपत्रे पृष्ठ क्र. :- 01 ते 215

(मंजिरी डिमेलो)
जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्यलेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:-

मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (अग्निशमन) यांना माहिती
करीता अग्रेषीत.

पोच
उपायुक्त दालन
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत कार्यवाहीस्तव:-

जनमाहिती अधिकारी तथा
प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी,
अग्निशमन विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोच
26-5-2023
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\audit dep 2020-21\माहिती अधिकार\विनित शहा, Interanal, ag, local.docx